MHBI050011612022

दाखल दिनांक : १४.११.२०२२
नोंदणी दिनांक : १४.११.२०२२
निकाल दिनांक : १२.०६.२०२३
कालावधी : ०६ महिने २९ दिवस

## दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अंबाजोगाई जि.बीड यांचे न्यायालयात

**(न्यायासन अधिकारी : मा.ये.वाघ)**

**हिंदु विवाह अर्ज क्रमांक २६५/२०२३** **नि.क्र. १० /अ**

**अर्जदार** ०१. **सिता भ्र. सचिन गोसावी**
वय ३४ वर्ष, धंदा नोकरी
रा. बाळकृष्णनगर,शिवनेरी कॉलनी
गारखेडा, औरंगाबाद.
ह.मु. अहिल्यादेवीनगर, केज
ता.केज जि.बीड.

०२. **सचिन पिता अरविंद गोसावी**
वय ३८ वर्ष, धंदा मजुरी
रा. बाळकृष्णनगर,शिवनेरी कॉलनी
गारखेडा, औरंगाबाद

**अर्ज**:- **कलम १३ (ब) हिंदु विवाह अधिनियम १९५५ प्रमाणे संमतीने घटस्फोट मिळणे करीता अर्ज**.

अर्जदार क्रमांक ०१ करीता विधीज्ञ: श्री.एन.एच.नेहरकर,
अर्जदार कमांक ०२ करीता विधीज्ञ: श्री.एस.आर.मोरे,

**न्यायनिर्णय**
( **पारित दिनांक १२ जुन २०२३**)

०१. अर्जदार क्रमांक ०१ व ०२ यांनी प्रस्तुत अर्ज हिंदु विवाह अधिनियम १९५५ चे कलम १३ (ब) नुसार सहसंमतीने घटस्फोट हुकूमनामा मिळणे करीता दाखल केलेला आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by WAGH MANIK YEDU
Date: 2023.06.12 13:22:47 +0000

अर्जदार क्रमांक ०१ व ०२ यांचा विवाह दिनांक ११.०५.२०१४ मौजे केज जि.बीड येथे झालेला आहे. अर्जदारांचे पती-पत्नीचे नाते आजतागायत अस्तित्वात आहेत. सदर विवाह संबंधातुन उभयतांना एक मुलगी नामे शर्वरी ही आहे.

०२. विवाहानंतर उभयतामध्ये छोटया छोटया कारणावरुन पटेनासे झाले त्यामुळे त्यांचे विचारामध्ये विभिन्नता निर्माण झाली आणि एकमेकांविषयी गैरसमज निर्माण होउ लागले. अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हे सहा वर्षपुर्वी पासुन विभक्त राहात आहे. अर्जदारांमधील वैचारिक मतभेद व गैरसमज आपसात मिटविण्याबाबत नातेवाईकांमार्फत अनेक वेळा प्रयत्न करुन देखील त्यांना यश आले नाही. अर्जदार क्र १ व २ यांना भविष्यात पती पत्नी म्हणुन एकत्र राहणे अशक्य झाले आहे. त्यामुळे अर्जदारांनी संमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला, असे अर्जदारांचे कथन आहे.

०४. अर्जदार क्रमांक ०१ व ०२ यांनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ निशाणी क्रमांक ०७ व ०८ वर शपथपत्र दाखल केलेले आहेत. अर्जदार क्रमांक ०१ ही लग्नानंतर अंदाजे एक वर्ष पर्यत अर्जदार क्रमांक ०२ सोबत नांदली आहे. दरम्यानचे काळात उभयतांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होउन वाद होउ लागले. अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हे मागील सहा वर्षा पासुन विभक्त राहात आहेत. त्यांना एकत्र आणण्यासाठी नातेवाईकांनी प्रयत्न करुन देखील यश आले नाही. अर्जदारां मधील वैचारिक मतभेद, गैरसमज विकोपास गेले असुन त्यांना एकत्र राहणे शक्य नाही. या न्यायालयाने देखील अर्जदारांना एकत्र राहण्याबाबत सुचित केले होते. परंतु वैचारिक मतभेदामुळे ते एकत्र राहण्यास तयार नाहीत. उभयपक्षांनी प्रस्तुत अर्ज दिनांक १४.११.२०२२ रोजी दाखल केला असुन त्यानंतर त्यांना आपसातील मतभेद मिटविण्यासाठी सहा महिन्याचा कालावधी देण्यात आला, परंतु त्या काळात त्यांच्यातील मतभेद मिटले नाहीत. अर्जदार क्र १ व २ हे राजीखुशीने व संमतीने एकमेकांपासुन विभक्त होण्यास तयार आहेत. त्यांना न्यायालयाने घ टस्फोट देण्याबाबतचा हुकूमनामा करण्यात यावा या मागणीवर ते दोघेही ठाम असल्याचे दिसुन येते. एकंदरीत परिस्थिती पाहता अर्जदारांमधील वैचारिक मतभेद व भिन्न आवडीनिवडी यामुळे त्यांना पती पत्नी म्हणुन एकत्र राहणे अशक्य आहे या निर्णयाप्रत मी आलो आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by WAGH MANIK YEDU
Date: 2023.06.12 13:23:23 +0000

०५. अर्जदार क्र १ व २ यांची कोणतीही संयुक्तिक मालमत्ता नाही. अर्जदार क्र २ कडुन अर्जदार क्र १ व मुलगी शर्वरी यांना भावी आयुष्याची कायम स्वरुपी पोटगी म्हणुन रक्कम रुपये ४,००,००/- देण्याचे ठरले आहे. सदरची रक्कम मिळाल्या बाबत अर्जदार क्र १ हिने आपले पुराव्याचे शपथपत्रात मान्य केले आहे. अर्जदार क्र १ हिने अर्जदार क्र २ प्रती असणारे पत्नीत्वाचे हक्क सांगणार नाही असे कबुल केले आहे.

०६. अर्जदारां मधील वैचारिक मतभेद पराकोटीस गेल्याचे निष्पन्न झाले असुन अशा परिस्थितीत त्यांना पती-पत्नी म्हणुन एकत्रित जिवन व्यतित करण्यास भाग पाडणे उभयपक्षांच्या हिताच्या व न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०२. **सिता भ्र. सचिन गोसावी** (अर्जदार क्रमांक १) व **सचिन पिता अरविंद गोसावी** (अर्जदार क्रमांक २) यांचा हिंदु विवाह अधिनियम १९५५ चे कलम १३ (ब) अन्वये दिनांक १२ जुन २०२३ पासुन विवाह विच्छेद करण्यात येत आहे.

०२. वरील प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WAGH MANIK YEDU
Date: 2023.06.12 13:23:35 +0000

दिनांक : १२ जुन २०२३

**(मा.ये.वाघ)**
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
**अंबाजोगाई.**

प्रमाणपत्र

मी अभिकथन करते की, या पी.डी.एफ वरुन अपलोड केलेल्या आदेशाातील शब्द न शब्द हे मुळ आदेशा प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| डिक्टेशन दिले | : | १२ जुन २०२३ |
| लिप्यंतर केले | : | १२ जुन २०२३ |
| तपासले व सही केली | : | १२ जुन २०२३ |

सही/-
सौ.पी.एस.कुलकर्णी
मराठी लघुलेखक ग्रेड-३
दिवाणी न्यायालय (व.स्तर) अंबाजोगाई.

दिनांक १२ जुन २०२३
अंबाजोगाई